दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...


epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ५०६ वा • गुरूवार, ता. २९ जानेवारी २०२६ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००




# अजित पवार यांचा अपघात

**बारामती । रयत समाचार**

**महाराष्ट्राच्या राजकारणाला आज मोठा धक्का बसला. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते अजित अनंतराव पवार यांचे सकाळी बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातात निधन झाले. मुंबईहून बारामतीकडे येणारे चार्टर्ड विमान लँडिंगदरम्यान नियंत्रणाबाहेर जाऊन कोसळले. या भीषण दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह विमानातील अन्य चार जणांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात एक सुरक्षा अधिकारी, एक सहाय्यक, पायलट आणि सह-पायलट यांचा समावेश आहे. सकाळी सुमारे ८.४५ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली.**



फ्लाइट ट्रॅकिंग डेटानुसार विमानाने सकाळी ८.१० वाजता मुंबईहून उड्डाण केले होते. बारामती विमानतळावर लँडिंगसाठी दुसऱ्यांदा प्रयत्न करत असताना विमान कोसळल्याची माहिती समोर आली आहे. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, लँडिंगच्या वेळी विमान अस्थिर दिसत होते. धावपट्टीजवळ कोसळताच विमानाला भीषण आग लागली आणि चार ते पाच स्फोट झाले. आगीची तीव्रता इतकी प्रचंड होती की, मदतकार्य तात्काळ सुरू होऊनही विमानातील प्रवाशांना वाचवता आले नाही. विमानाचे अवशेष धावपट्टीजवळील मोकळ्या मैदानात विखुरलेले आढळून आले. अजित पवार हे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारासाठी बारामतीला येत होते. त्यांच्या आज चार ते सहा प्रचारसभा नियोजित होत्या. अपघातानंतर त्यांचे पार्थिव बारामती येथील वैद्यकीय महाविद्यालयात आणण्यात आले. २९ जानेवारी सकाळी ११ वाजता बारामतीत अंत्यसंस्कार होणार असून, नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक प्रमुख नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**राजकीय नेत्यांकडून श्रद्धांजली**

नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वर शोक व्यक्त करत, अजित पवार यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक आहे. ते लोकांचे नेते होते आणि त्यांनी सर्वसामान्यांसाठी काम केले, असे म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बारामतीत पोहोचून कुटुंबीयांची भेट घेतली. शरद पवार, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार आणि अन्य कुटुंबीय बारामतीत दाखल झाले असून परिसरात शोककळा पसरली आहे.

ममता बॅनर्जी, राहुल गांधी, अखिलेश यादव, ओमर अब्दुल्ला यांच्यासह देशभरातील अनेक नेत्यांनी श्रद्धांजली अर्पण केली. राज्य सरकारने २८ ते ३० जानेवारीदरम्यान तीन दिवसांचा राजकीय शोक जाहीर केला असून, राज्यभर शासकीय इमारतींवर ध्वज अर्ध्यावर ठेवण्यात आले आहेत.

**अजित पवारांचा राजकीय वारसा**

अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत प्रभावी नेतृत्व मानले जात होते. बारामती हा त्यांचा बालेकिल्ला राहिला. सहकार चळवळीतून राजकारणात आलेल्या अजित पवारांनी जलसंपदा, वित्त, नियोजन यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली. ते महाराष्ट्राचे सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या नेत्यांपैकी एक होते. २०२३ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर त्यांनी बहुसंख्य आमदारांसह सत्ताधारी महायुतीत प्रवेश करत सरकारमध्ये निर्णायक भूमिका बजावली.

**चौकशी सुरू**

विमान अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. नागरी विमान वाहतूक महासंचालनालय आणि विमान अपघात तपास ब्युरो यांनी चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणाची सखोल तपासणी व्हावी, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे. महाराष्ट्राने आज एका अनुभवी, कर्तबगार आणि प्रभावी नेत्याला गमावले आहे.

## प्रकरण संशयाच्या भोवऱ्यात सीबीआय चौकशीची मागणी

### सुप्रीम कोर्टातील वकिलाचा घातपाताचा दावा

बारामती । रयत समाचार

२८ जानेवारी २०२६ राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सकाळी बारामती येथे झालेल्या विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या भीषण दुर्घटनेत एकूण पाच जणांचा मृत्यू झाला असून, या अपघातामागे केवळ तांत्रिक कारण नसून घातपाताचा संशय असल्याचा खळबळजनक दावा सुप्रीम कोर्टातील एका वकिलाने केला आहे. मुंबईहून बारामतीकडे जिल्हा परिषद निवडणूक प्रचारासाठी जात असताना खासगी कंपनीच्या विमानाचा लँडिंगदरम्यान अपघात झाला. सुरुवातीला दाट धुके आणि तांत्रिक बिघाडामुळे ही दुर्घटना घडल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र आता या घटनेला वेगळं वळण मिळालं आहे. मुंबई उच्च न्यायालय आणि सुप्रीम कोर्टात कार्यरत असलेले ॲड. नितीन सातपुते यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत या अपघाताबाबत गंभीर संशय व्यक्त केला आहे. “विमानात जाणूनबुजून बिघाड ठेवण्यात आला होता का, की हा केवळ अपघात आहे, याची सखोल चौकशी झाली पाहिजे,” अशी मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणाची सीबीआयमार्फत चौकशी करावी, अशीही त्यांनी मागणी केली.

अपघाताचा घटनाक्रम तज्ज्ञांच्या माहितीनुसार, बारामती विमानतळावर दाट धुक्यामुळे धावपट्टी स्पष्ट दिसत नव्हती. या विमानतळावर प्रणाली नसल्याने पायलटला मॅन्युअल लँडिंग करावी लागली. पहिला लँडिंग प्रयत्न अयशस्वी ठरल्यानंतर विमान पुन्हा हवेत घेण्यात आलं. दुसऱ्या प्रयत्नात विमान धावपट्टीवर उतरेल असा अंदाज होता, मात्र जमिनीपासून सुमारे १०० फूट उंचीवर असताना विमानाचं संतुलन बिघडलं. विमान धावपट्टीवर पोहोचण्याआधीच बाजूला घसरलं आणि काही सेकंदांत मोठा स्फोट होऊन अपघात झाला. अपघातापूर्वी पायलटने कॉल दिल्याची माहिती च्या सूत्रांनी दिली आहे. अपघातानंतर लागलेल्या भीषण आगीमुळे कुणालाही वाचवता आलं नाही. या दुर्घटनेनंतर राज्यभरात शोककळा पसरली असून, राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. अपघाताचं नेमकं कारण काय, हे तपासातूनच स्पष्ट होणार आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातातील विमान कंपनी



**मुंबई । रयत समाचार**

अजित पवार यांच्या मृत्यूच्या विमान अपघातात वीएसआर वेंचर्स ही कंपनी संबंधित असल्याची माहिती समोर येत आहे. ही दिल्लीस्थित चार्टर विमान सेवा देणारी कंपनी असून, प्रामुख्याने प्रायव्हेट जेट आणि एअर ॲम्ब्युलन्स सेवांवर तिचा भर आहे. या कंपनीचा पहिला अपघात सप्टेंबर २०२३ मध्ये झाला होता.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित आशाताई अनंतराव पवार यांच्या निधनाच्या बातमीने संपूर्ण देशात शोककळा पसरली. दिल्लीहून मुंबईकडे येणाऱ्या प्रायव्हेट जेटचा भीषण अपघात झाला असून, त्यात हा दुर्दैवी प्रकार घडल्याची माहिती आहे.



हा विमान अपघात वीएसआर वेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड या चार्टर कंपनीच्या विमानाचा असल्याचे सांगितले जात आहे. ही कंपनी दिल्लीस्थित असून, नॉन-शेड्यूल्ड एअर ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेस पुरवते. हा अपघात कंपनीसाठी दुसरा मोठा प्रकार मानला जात असून, त्यामुळे कंपनीच्या सुरक्षितता (सेफ्टी) व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. अपघातग्रस्त विमान बॉम्बार्डियर लियरजेट ४५ या मॉडेलचे होते. हे मिड-साईज बिझनेस क्लास जेट असून, कंपनीच्या फ्लीटचा भाग होते.

वीएसआर वेंचर्स कंपनीचा इतिहास आणि मालकी : लिंक्डइनवरील कंपनी प्रोफाइलनुसार, वीएसआर वेंचर्स प्रायव्हेट लिमिटेडची स्थापना २००९ मध्ये झाली होती. मात्र, एमसीए () च्या नोंदीनुसार कंपनीची स्थापना २०११ मध्ये झाली असल्याचे नमूद आहे. कंपनीचे संचालक विजयकुमार सिंह आणि त्यांचे पुत्र रोहित सिंह असून, दोघेही प्रशिक्षित पायलट आहेत. कंपनीचे मुख्यालय दिल्लीतील महिपालपूर येथे आहे. दिल्ली, मुंबई, हैदराबाद आणि भोपाळ या शहरांमध्ये कंपनीच्या सेवा कार्यरत असल्याचे मानले जाते.

बिझनेस मॉडेल, फ्लीट आणि सेफ्टी रेकॉर्ड : वीएसआर वेंचर्सचे बिझनेस मॉडेल हे प्रायव्हेट जेट चार्टर, एअर ॲम्ब्युलन्स, एम्प्टी लेग फ्लाइट्स आणि विमान लीजिंग या सेवांवर आधारित आहे. कंपनीच्या फ्लीटमध्ये मिड-साईज बिझनेस जेट्सचा समावेश असून, त्यामध्ये ४५ सारखी विमाने प्रमुख आहेत. उपलब्ध माहितीनुसार, फ्लीटमधील विमानांचे सरासरी वय सुमारे १९ वर्षे आहे. कंपनीत १०० पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असल्याचे सांगितले जाते. याआधीही एका क्रॅश लँडिंगच्या घटनेनंतर कंपनी तपासाच्या फेऱ्यात आली होती, त्यामुळे सेफ्टी स्टँडर्ड्सवर प्रश्न उपस्थित झाले होते. सध्याच्या अपघातानंतर पुन्हा एकदा कंपनीचा सेफ्टी रेकॉर्ड चर्चेत आला आहे.

वीएसआर वेंचर्सची मागील दुर्घटना आणि चौकशी : सप्टेंबर २०२३ मध्ये मुंबई विमानतळावर वीएसआर वेंचर्सच्या एका ४५ विमानाचा मोठा अपघात झाला होता. मुसळधार पावसात विमानाची क्रॅश लँडिंग झाली होती. विमान रनवेवरून घसरून दोन तुकड्यांमध्ये तुटले होते आणि त्याला आग लागली होती. सुदैवाने सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स बचावले होते; मात्र सहपायलट गंभीर जखमी झाला होता. या प्रकरणाची चौकशी एअरक्राफ्ट एक्सीडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो कडून करण्यात आली होती. मात्र, कंपनीवर कोणतीही कारवाई किंवा निलंबन करण्यात आले नव्हते.

सध्याच्या अपघातानंतर कंपनीवर आर्थिक परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यात विमानाचे

## कातरलेले शब्द, पाणावलेले डोळे

## लाडक्या पुतण्याला शरद पवारांची भावनिक श्रद्धांजली

**बारामती । रयत समाचार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला असून, या दुःखद घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी कातर शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. “अजित, तुझ्या निर्णयक्षमतेला महाराष्ट्र मुकला,” असे म्हणताना त्यांचा आवाज घोगरा झाला होता, तर डोळ्यांत अश्रू साठलेले स्पष्ट दिसत होते.



अजित पवार यांच्या निधनाची बातमी समजताच पवार कुटुंबीयांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर मोठा आघात झाला. ग्रामीण भागातील कार्यकर्ते धाय मोकलून रडत असल्याचे चित्र दिसून आले, तर बारामती आणि बीड जिल्ह्यात नागरिकांनी बंद पाळून शोक व्यक्त केला. दिल्लीमध्ये असतानाच ही बातमी समजल्यानंतर शरद पवार तातडीने बारामतीकडे रवाना झाले. अपघातस्थळाची पाहणी केल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. “अजित पवारांचे निधन हे महाराष्ट्राचे कधीही न भरून निघणारे नुकसान आहे. निर्णय घेण्याची विलक्षण क्षमता असलेला नेता आपण गमावला आहे,” असे त्यांनी नमूद केले.

या अपघाताबाबत कोणतेही राजकारण करू नये, असे आवाहन करत शरद पवार म्हणाले, “हा निव्वळ अपघात आहे. यामागे कोणताही राजकीय अर्थ काढू नये. या घटनेच्या वेदना केवळ कुटुंबापुरत्या मर्यादित नसून संपूर्ण महाराष्ट्राला झालेल्या आहेत.” दरम्यान, बारामती विमानतळाच्या रनवेवर जाऊन शरद पवारांनी प्रत्यक्षदर्शींकडून अपघाताची माहिती घेतली. विमान रनवे संपण्यापूर्वी सुमारे एक किलोमीटर अंतरावर कोसळल्याची माहिती त्यांना देण्यात आली. यावेळी शरद पवार भावुक झाल्याचे दिसून आले. अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर खासदार सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्याही अश्रूंचा बांध फुटला. कुटुंबीयांचा हा दुःखद क्षण पाहून उपस्थितांनाही भावना अनावर झाल्या.

## महाराष्ट्र शोकमय; आज अजित पवारांवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**बारामती । रयत समाचार**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवाला आज अंतिम अभिवादन केले जाणार आहे. सकाळी त्यांच्या मूळ गावी काटेवाडी येथे पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार असून, यावेळी नागरिक, कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे. काटेवाडी परिसरात शांतता आणि शोकमय वातावरण राहणार आहे. पार्थिव बारामती येथील विद्या प्रतिष्ठान येथे असणार आहे या दरम्यान ठिकठिकाणी नागरिकांकडून पुष्पवृष्टी करून श्रद्धांजली अर्पण केली जाणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर सकाळी १० वाजल्यापासून पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. राज्यभरातून मंत्री, आमदार, खासदार, प्रशासकीय अधिकारी तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते अंत्यदर्शनासाठी उपस्थित राहणार आहेत. सामान्य नागरिकांसाठी स्वतंत्र रांगा आणि नियोजन करण्यात आले आहे. ११ वाजता पूर्ण शासकीय इतमामात अजित पवार यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. यावेळी पोलीस दलाकडून शस्त्रसलामी देण्यात येणार असून, शासकीय ध्वजाने आच्छादित पार्थिवाला अखेरचा निरोप दिला जाणार आहे. अंत्यसंस्काराच्या वेळी वातावरण अत्यंत भावनिक होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या शासकीय दुखवटाच्याच्या पार्श्वभूमीवर आज राज्यातील शासकीय कार्यक्रम साध्या स्वरूपात पार पडणार आहेत. अनेक सामाजिक संस्था, शाळा आणि महाविद्यालयांकडून श्रद्धांजली सभा आयोजित केल्या जाणार आहेत. आज संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा अनुभवास येणार आहे.

## निर्भीड, दिलदार असा कामाचा ‘दादा’ माणूस हरपला- कोल्हे

**कोपरगाव । किसन पवार**

महाराष्ट्र राज्याचे कुशल राजकारणी, निर्भीड व्यक्तिमत्त्व आणि रुबाबदार शैली असा त्रिवेणी संगम असलेले नेतृत्व अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी निधनाने आपण एका सडेतोड, हजरजबाबी उपमुख्यमंत्र्याला गमावले, अशी प्रतिक्रिया संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी व्यक्त केली. त्यांच्या नावातही ‘दादा’ होते आणि कामातही ते दादा होते, असेही ते म्हणाले. संजीवनी उद्योग समूहाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे युवा अध्यक्ष विवेक कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनीही त्यांच्या दुर्दैवी निधनाबद्दल शोक व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली. बिपीन कोल्हे पुढे म्हणाले की, अजितदादा पवार यांचे आजोळ अहिल्यानगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा येथे होते. दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी येथेच घेतले. दिलखुलास व्यक्तिमत्त्व, जे काही आहे ते आडपडदा न ठेवता स्पष्टपणे मांडणे आणि जे काम होणारे असेल ते तात्काळ हातावेगळे करणे, या राजकीय हातोटीला आपण कायमचे मुकलो आहोत. राज्याच्या राजकारणात त्यांचा वेगळाच दबदबा होता.

माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्यासोबत काम करताना राज्यासह देशातील साखर कारखानदारीच्या प्रश्नांचा अभ्यास करून ते हाताळता आले, अशी स्पष्ट कबुली त्यांनी अलिकडेच देशातील पहिल्या सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या बायो-सीएनजी प्रकल्प उद्घाटनप्रसंगी ५ ऑक्टोबर २०२५ रोजी संजीवनी कार्यस्थळावर दिली होती. अलिकडेच देवेंद्र फडणवीस यांच्या महायुती सरकारमध्ये त्यांनी आठव्यांदा उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती. अर्थमंत्री म्हणून त्यांनी राज्यातील अनेक विकास प्रकल्पांना गती देत वेगवान प्रशासनाची चुणूक दाखविली होती. त्यांच्या नेतृत्वाखाली पुणे, पिंपरी-चिंचवड, बारामती आदी शहरांचा विकास झाला.

तत्कालीन जलसंपदा मंत्री म्हणून त्यांनी ऊर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरणे, गोदावरी कालवे, निळवंडे धरण यासह अनेक सिंचन प्रश्नांना चालना देत ते पूर्णत्वास नेले. त्यांच्यासोबत महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, रयत शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन आदी संस्थांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी मतदारसंघातील पश्चिम भागातील जिरायत क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या उजनी उपसा सिंचन योजनेच्या कामासाठी तत्कालीन जलसंपदा मंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मोठा पाठपुरावा केला होता. त्या प्रश्नात त्यांनी स्वतः लक्ष घालून अर्थमंत्री म्हणूनही निधी उपलब्ध करून दिला व त्यातून पाझर तलाव भरण्याची योजना साकारली होती.

# महावितरणच्या दुर्लक्षामुळे ऊस वाहतुकीस अडथळे

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथे मागील तीन वर्षांतील चांगल्या पावसामुळे ऊस पिकाचे उत्पादन लक्षणीय वाढले आहे. सध्या गळीत हंगाम सुरू असून गावात सुमारे दहा हजार टन ऊस तोडणी सुरू आहे. शेतकरी आपला ऊस विविध साखर कारखान्यांना ट्रकद्वारे पाठवत आहेत. मात्र पिंपळगाव ते वडगाव या मुख्य रस्त्यावर महावितरणच्या मेन लाईनच्या विद्युत तारा अत्यंत खाली आल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत.




भरलेले ऊस ट्रक अडथळ्यामुळे वारंवार थांबवावे लागत असून शेतकऱ्यांना दहा ते पंधरा ठिकाणी तारा उचलून घ्याव्या लागत आहेत. त्यानंतरच ट्रक पुढे जात आहेत. या प्रकारामुळे शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

ट्रक भरल्यानंतर तारा उचलणे व पुन्हा खाली सोडणे यामध्ये वेळ वाया जातो. काही वेळा तारा उचलताना अपघाताचा धोका देखील निर्माण होतो. ऊस हे नाशवंत पीक असल्याने विलंब झाल्यास तोडलेला ऊस खराब होण्याची भीती असते. परिणामी साखर कारखान्यांना ऊस पुरवठ्यात अडथळे येत असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

मागील वर्षीच्या पावसामुळे या भागातील ऊस उत्पादनात २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली असून साखर कारखान्यांचा गळीत हंगाम जोमात सुरू आहे. अशा स्थितीत वाहतूक मार्गावरील हे अडथळे शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहेत. स्थानिक ग्रामस्थांनी याबाबत महावितरणकडे तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप कोणतीही दखल घेतलेली नाही.

महावितरणने तात्काळ या रस्त्यावरील विद्युत तारा उंच कराव्यात किंवा तात्पुरता उपाय करावा, अन्यथा हंगामात अडचणी आणखी वाढण्याची शक्यता असल्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

> ट्रक भरून निघाला की रस्त्यावर दहा ठिकाणी थांबावे लागते. तारा उचलण्यासाठी दोरी किंवा काठी वापरावी लागते. हे रोजचेच काम झाले असून वेळ व श्रम वाया जात आहेत.
> **–आसाराम झिने, ऊस उत्पादक शेतकरी**

# प्रत्येक निरोगी व्यक्तीने वर्षातून एकदा तरी रक्तदान करावे- डॉ. जहीर मुजावर

## अल करम हॉस्पिटलचे रक्तदान शिबिर संपन्न

**अहमदनगर । आबीद खान**

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तामुळेच एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचू शकतात. अपघात, शस्त्रक्रिया, गंभीर आजार अशा अनेक प्रसंगी रक्ताची तातडीची गरज भासते. अशावेळी वेळेवर उपलब्ध झालेले रक्त म्हणजे दुसऱ्याला दिलेले नवे आयुष्य असते. नियमित रक्तदान केल्याने रक्तदात्याचे आरोग्यही चांगले राहते, हे शास्त्राने सिद्ध झाले आहे. समाजातील प्रत्येक निरोगी व्यक्तीने वर्षातून किमान एकदा तरी रक्तदान करण्याचा संकल्प केला तर कोणाच्याही रक्ताअभावी प्राण जाणार नाही, असे प्रतिपादन अल करम हॉस्पिटलचे डॉ. जहीर मुजावर यांनी केले.



भारताच्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अल करम हॉस्पिटल व अल करम सोसायटीच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिराचे उद्घाटन डॉ. जहीर मुजावर यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. अशपाक पटेल, डॉ. नाजेमा जहीर, डॉ. जैनब पटेल, शाहीद सय्यद, अर्शद सय्यद, राजीक खान आदी मान्यवर उपस्थित होते. रक्तदान शिबिरात विविध वयोगटातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली.

रक्त संकलनासाठी अर्पण ब्लड बँकचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिरात रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांचा व उपस्थित मान्यवरांचा तौफिक तांबोली, शेरअली शेख, एजाज तांबोली यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना शाहीद सय्यद म्हणाले की, समाजाच्या हितासाठी असे उपक्रम राबविणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. रक्तदान, आरोग्य शिबिरे व सामाजिक सेवा यामुळे अनेक गरजूंचे प्राण वाचू शकतात. प्रत्येक व्यक्ती, संस्था व युवकांनी पुढाकार घेतल्यास समाज अधिक सशक्त बनेल.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी अल करम सोसायटी व अल करम हॉस्पिटलच्या सर्व सभासदांनी विशेष परिश्रम घेतले.

**झाडे लावा झाडे जगवा**

# शिक्षण विभागाचा 'शालार्थ' खोळंबा; शेकडो शिक्षक पगाराविना

अहमदनगर । रयत समाचार

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील भोंगळ कारभार व प्रशासकीय दप्तरदिरंगाईमुळे पुणे विभागातील शेकडो शिक्षकांचे भवितव्य अंधारात सापडले आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून शासनाची समायोजन प्रक्रिया पूर्ण होऊनही केवळ शालार्थ आय.डी. मंजूर न झाल्याने हे शिक्षक वेतनापासून वंचित आहेत. महानगरीय महागाई व कौटुंबिक आर्थिक अडचणींमुळे शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली असून, या अन्यायाविरोधात शिक्षक भारती संघटनेने थेट आरपारची लढाई पुकारली आहे.

> प्रशासकीय दिरंगाईमुळे शिक्षकांना त्यांच्या हक्काच्या पगारासाठी रस्त्यावर उतरावे लागणे हे दुर्दैवी आहे. ही तांत्रिक प्रक्रिया नसून प्रशासकीय उदासीनता आहे. ७ दिवसांत निकाल न लागल्यास शिक्षक भारती कायदेशीर मार्गाने शिक्षण उपसंचालक कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करेल.
> प्रा. महेश पाडेकर, विभागीय कार्याध्यक्ष, शिक्षक भारती

महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार, कर्मचाऱ्याचे समायोजन झाल्यानंतर त्याला तात्काळ वेतन मिळणे हा त्याचा वैधानिक अधिकार आहे. शासन निर्णयानुसार अनेक शिक्षकांचे १५ मे २०२४ रोजीच विविध कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रास्तावित पदांवर समायोजन करण्यात आले. मात्र नियुक्ती होऊन आणि सर्व आवश्यक कागदपत्रांच्या फाईल्स कार्यालयात जमा होऊनही प्रशासन शालार्थ आय. डी. जनरेट करण्यास टाळाटाळ करत आहे. सप्टेंबर २०२४ पासून अनेक प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयात प्रलंबित असून, या दिरंगाईमागे नेमके गौडबंगाल काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

''आम्ही विहित मुदतीत फाईल जमा केली, वारंवार पाठपुरावा केला, तरीही केवळ तांत्रिक कारणे पुढे करून आमचे पगार रोखले जात आहेत,'' अशी भावना पीडित शिक्षक व्यक्त करत आहेत. एका बाजूला शासन डिजिटल इंडियाची घोषणा करत असताना, दुसरीकडे एका शालार्थ आय.डी.साठी शिक्षकांना महिनोनमहिने कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. हा प्रकार केवळ आर्थिक शोषण नसून मानवी हक्कांचे उल्लंघन असल्याचेही संघटनेने म्हटले आहे.

शिक्षक भारती संघटनेने शिक्षण उपसंचालकांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, प्रलंबित सर्व शालार्थ आय.डी. येत्या ७ कार्यालयीन दिवसांत मंजूर न झाल्यास पुणे विभागीय कार्यालयासमोर तीव्र धरणे आंदोलन करण्यात येईल. तसेच या विलंबास कारणीभूत असणाऱ्या संबंधित टेबल कारकून व अधिक्षकांवर महाराष्ट्र दप्तर दिरंगाई प्रतिबंधक कायदा अंतर्गत कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून सुप्त कलागुणांना वाव मिळतो- डॉ. सर्जेराव निमसे

## भाग्योदय विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात




**अहमदनगर । रयत समाचार**

भारत हा जगातील एक मोठा लोकशाही देश असून देशात नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. समाजाधारित शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी सर्व शाळा, कॉलेज व महाविद्यालयांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिक्षण व्यवस्थेतील चुकीच्या धोरणांमुळे देशात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढली आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी झाली तरच भारत विकसित राष्ट्र बनू शकतो. विद्यार्थ्यांनी नेहमी मोठी स्वप्ने पाहावीत, विद्यार्थी महत्त्वाकांक्षी असला पाहिजे तरच तो प्रगती करू शकतो व आपल्या क्षेत्रात आयकॉन बनतो, असे प्रतिपादन डॉ. सर्जेराव निमसे यांनी केले.

ते भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगन्नाथ भोर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भानुदास कोतकर, संचालक रघुनाथ लोंढे, प्रसाद आंधळे, सागर सातपुते, प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुका माता प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे, जयद्र खाकाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. निमसे पुढे म्हणाले की, भाग्योदय विद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेत असलेले प्रयत्न कौतुकास्पद असून विद्यार्थ्यांनी या संधींचा योग्य उपयोग करून घ्यावा. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगन्नाथ भोर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारताला शिक्षणाची जितकी गरज आहे तितकीच गरज जिल्ह्यालाही आहे. भाग्योदय विद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबत विविध सहशालेय उपक्रमांद्वारे त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांचा विकास केला जातो. याच उपक्रमांतून उद्याचे शास्त्रज्ञ, अभिनेते व संशोधक घडत असतात. विद्यार्थ्यांनी वर्षभर होणाऱ्या शालेय व सहशालेय उपक्रमांत सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी नमूद केले.


कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांनी 'स्वच्छ सुंदर विद्यालय', 'मुख्यमंत्री माझी शाळा स्वच्छ शाळा', गणित–विज्ञान प्रदर्शन, स्पर्धा परीक्षा केंद्र आदी उपक्रमांची माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्ती, शिक्षण, स्त्रियांवरील अत्याचार, छत्रपती संभाजीराजेंचा पराक्रम, दमलेल्या बापाची गोष्ट, पर्यावरण जागृती, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, अध्यात्म, पाणी आडवा पाणी जिरवा अशा विविध विषयांवरील सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबासाहेब कोतकर, गोविंद कदम, गोरक्ष कांडेकर, सोपान तोडमल, एकनाथ होले, धनंजय बारगळ, संतोष काकडे, शिवाजी धस, आदिनाथ ठुबे, रुपाली शिंदे, सुनिता मेढे, गणेश गायकवाड, बाळू कावरे, सुधाकर गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी पालकवर्ग, केडगाव ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेहेरबाबांच्या अमरतिथी सोहळ्यास ३० जानेवारीला सुरुवात

**अहमदनगर । रयत समाचार**

अरणगाव रोडवरील मेहेराबाद येथे अवतार मेहेरबाबा यांच्या समाधीस्थळी ५७ वी अमरतिथी (पुण्यतिथी) सोहळा ता. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे. या सोहळ्यासाठी देशातून सुमारे एक लाखांहून अधिक तसेच परदेशातून सुमारे ५०० बाबाप्रेमी व भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती विश्वस्त मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली. मेहेरबाबांचे जगभरात असंख्य भक्त व केंद्रे असून सर्व जाती–धर्मातील लोकांना मानवता व सत्याचा संदेश देत त्यांनी जगभर प्रवास केला. ''जगात मी कोठेही देह सोडला तरी मेहेराबाद येथे बांधलेल्या समाधीत मला समाधिस्त करावे,'' अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. ता. ३१ जानेवारी १९६९ रोजी त्यांचे महानिर्वाण झाले. त्यामुळे दरवर्षी अमरतिथी सोहळ्यासाठी येथे लाखो भाविक दाखल होत असतात.



याबाबत अधिक माहिती देताना चेअरमन फॉमरोज मिस्री यांनी सांगितले की, ता. ३० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता बाबांची प्रार्थना व आरतीने कार्यक्रमास प्रारंभ होईल. त्यानंतर रात्री १२ वाजेपर्यंत फिल्म शो तसेच विविध केंद्रांतून आलेले भाविक भजने सादर करतील. ता. ३१ रोजी सकाळी ७ वाजता आरती व प्रार्थना होईल. सकाळी ११ वाजता चेअरमन फॉमरोज मिस्री यांचे व्याख्यान होईल, त्यानंतर मेहेर धून म्हटली जाईल. बाबांनी देहत्याग केलेल्या दुपारी १२ वाजता १५ मिनिटे मौन पाळण्यात येईल. त्यानंतर सर्व भाषांतून आरती व प्रार्थना होईल. रात्री १२ वाजेपर्यंत भजने, बाबांवरील सांस्कृतिक व नृत्य कार्यक्रम, नाटक, गझल आदी कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत.

ता. १ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता कार्यक्रमास सुरुवात होऊन दुपारी १ वाजता आरती व प्रार्थनेनंतर सोहळ्याची सांगता होईल. दर्शनासाठी भाविकांना क्रमांक दिले जात असल्याने शिस्तबद्ध पद्धतीने रांग लागते व गोंधळ टाळला जातो. संपूर्ण शांततेत हा उत्सव पार पडतो. ट्रस्टच्या वतीने भव्य मंडप उभारणीचे काम सुरू असून भाविकांसाठी स्वतंत्र स्त्री व पुरुष तंबू, गरम पाण्याची व्यवस्था, शौचालये, स्नानगृहे व आरोग्य सेवा उपलब्ध राहणार आहेत. सुमारे ४० हजार भाविक येथे मुक्काम करतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. रेल्वे स्टेशन व बसस्थानकावरून समाधीस्थळापर्यंत बससेवेची सुविधा उपलब्ध असून हजारो युवक स्वयंसेवक सेवा कार्यात सहभागी झाले आहेत.

# बाळासाहेब देशमुख यांच्या कथाकथनाने ग्रामस्थ मंत्रमुग्ध



**अहमदनगर । रयत समाचार**

७७व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जामखेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बांधखडक येथे अहिल्यानगरचे प्रसिद्ध कथाकार बाळासाहेब देशमुख यांच्या कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) येथे जिल्हा परिषद अहिल्यानगरमार्फत अभ्यासदौऱ्यासाठी निवड झालेल्या अक्षरा अमोल वारे या विद्यार्थिनीच्या हस्ते शालेय ध्वजारोहण करण्यात आले.

फ्यानंतर सामूहिक कवायत, विद्यार्थ्यांची भाषणे व सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद देत भरघोस रोख बक्षिसांचा वर्षाव केला. यावेळी कथाकार बाळासाहेब देशमुख यांनी 'अबोली' व 'शेतकरी राजा' या कथांचे अत्यंत प्रभावी सादरीकरण केले.

बांधखडकसह वनवेवस्ती व चव्हाणवस्ती येथील शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थांची लक्षणीय उपस्थिती होती. गावचे सरपंच राजेंद्र कुटे व उपसरपंच तानाजी फुंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना शाळेचे मुख्याध्यापक मनोहर इनामदार यांनी केली, तर आभारप्रदर्शन उपक्रमशील शिक्षक नितीन घालमे यांनी केले.

शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जयकुमार वारे तसेच अंकुश वारे, बाबा वारे, मंगेश वारे व आविष्कार वारे या दानशूर शिक्षणप्रेमींच्या वतीने कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.

# शिक्षक सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी प्रसाद शिंदे

**अहमदनगर । रयत समाचार**

शिक्षक नेते प्रसाद शिंदे यांची शिक्षक सेनेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. शिक्षकांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने केलेल्या लढाऊ कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आली. शिक्षक आमदार किशोर दराडे व राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

ही नियुक्ती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिक्षक आमदार किशोर दराडे व राज्य कार्यकारिणीच्या मान्यतेने करण्यात आली आहे. यावेळी शिक्षक नेते व पदाधिकारी उपस्थित होते. सत्काराला उत्तर देताना प्रसाद शिंदे यांनी शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटित लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर–०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# मुळा कारखाना येथे ईपीएफओचा ‘निधी आपके निकट’ संपन्न



**नेवासा । विजय खंडागळे**

मंगळवार ता. २७ जानेवारी २०२६ रोजी मुळा सहकारी साखर कारखाना, सोनई येथे ईपीएफओचा ‘निधी आपके निकट’ हा कॅम्प मुळा कारखाना प्रशासन व मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनच्या सहकार्याने उत्साहात पार पडला. या कॅम्पला नेवासा तालुक्यासह इतर तालुक्यांतील ईपीएस पेन्शनरांची लक्षणीय उपस्थिती होती.

या कॅम्पचे वैशिष्ट्य म्हणजे ईपीएफओ अहिल्यानगर कार्यालयाचे मुख्य प्रवर्तन अधिकारी सुरेंद्र कुलकर्णी, तसेच महेश ढाणके, दीपक पंडित, ओम पिंपरकर यांनी पेन्शनरांच्या समस्या समजून घेत नाशिक येथील मुख्य ईपीएफओ कार्यालयाशी तातडीने संपर्क साधून त्यांचे निराकरण केले. तसेच कागदपत्रांतील त्रुटी समक्षपणे समजावून सांगितल्याने पेन्शनरांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

अनेक पेन्शनरांनी मुळा कारखाना प्रशासन, युनियनचे पदाधिकारी तसेच अहिल्यानगर ईपीएस-९५ पेन्शनर संघटनेचे आभार मानले. माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या वतीने मुळा कारखान्याचे चेअरमन नानासाहेब तुवर, संचालक बाळासाहेब बनकर, एकनाथ जगताप यांनी उपस्थिती दर्शवून ईपीएफओ अहिल्यानगरच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सन्मान केला.

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक शरद बेल्हेकर, जनरल मॅनेजर शंकरराव दरंदले, ऑफिस सुप्रिडेंट घावटे, शेतकी अधिकारी विजय फाटके, फायनान्स मॅनेजर राऊत, भासार, रामकिसन पालवे तसेच कामगार उपस्थित होते. मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे अध्यक्ष अशोक पवार, उपाध्यक्ष कारभारी लोडे, खजिनदार सुभाष सोनवणे, सहचिटणीस भारत पटारे, कामगार संचालक विश्वास डेरे, किशोर राजगुरू व युनियनचे सर्व सदस्य उपस्थित होते. संघटनेचे सरचिटणीस डी. एम. निमसे यांनी कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. अहिल्यानगर ईपीएस-९५ पेन्शनर्स संघटनेच्या वतीने एस. के. सय्यद यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संघटनेचे प्रमुख पदाधिकारी आबा सोनवणे, बाबा आढाव, तुकाराम शिंदे, अर्जुन ओहोळ तसेच एस.टी. महामंडळ युनियनचे नेते बलभीम कुबडे, अशोक क्षीरसागर, राजूभाऊ माने उपस्थित होते. रयत समाचार

## श्रीराम विद्यालयात नशामुक्ती जनजागृती कार्यक्रम

# विद्यार्थ्यांनी घेतली नशामुक्तीची शपथ

**नगर तालुका । रयत समाचार**



नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे मंगळवार ता. २७ जानेवारी रोजी दादा रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी नशामुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमप्रसंगी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. सोमनाथ पुंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यसनांचे दुष्परिणाम, त्यातून होणारे शारीरिक व मानसिक नुकसान तसेच नशामुक्त जीवनाचे महत्त्व प्रभावी शब्दांत स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी आयुष्यात कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना पत्रकार खासेराव साबळे यांनी केली. त्यांनी नशामुक्त समाजनिर्मितीत शैक्षणिक संस्थांची भूमिका अधोरेखित केली. यावेळी दादा फाउंडेशनचे समन्वयक सुजित औताडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य संभाजी पवार होते. त्यांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक मूल्ये रुजतात, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना नशामुक्तीची शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत नशामुक्त जीवनशैली स्वीकारण्याचा निर्धार व्यक्त केला.

# तबला वादनात ओंकार चौकटे पहिला

**अहमदनगर । रयत समाचार**

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे नोव्हेंबरडिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या सांगीतिक परीक्षेत शिवरंजन संगीतालयाचा विद्यार्थी ओंकार चौकटे याने तबला वादन (विशारद प्रथम) परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले.

या यशासाठी त्याला शिवरंजन संगीतालयाचे संचालक व तबला वादक सुरज शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. ओंकार चौकटे हा पेमराज सारडा कॉलेज, नगर येथील वाणिज्य शाखेचा अंतिम वर्षाचा विद्यार्थी असून शिंदे मळा परिसरातील रहिवासी आहे. त्याच्या यशाबद्दल कुटुंबीय, गुरुजन व संगीतप्रेमींनी अभिनंदन केले आहे. रयत समाचार

# श्रीगोंदा विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्था संचलित श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय येथे ७६ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नवनिर्वाचित नगरसेविका मनीषा विठ्ठल आनंदकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड, स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष व चेअरमन बबनराव आनंदकर, नगरसेविका सोनाली गोरे व सुनिता घोडके, नगरसेवक अख्तर शेख व पांडुरंग पोटे, चेअरमन सुनील बोरुडे, इंजिनियर नवनाथ दरेकर, डोके मामा, विजय कापसे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजेंद्र कळसकर, संस्थेतील सेवानिवृत्त शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी, महिला पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर आधारित सामूहिक कवायत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत देशभक्ती, सामाजिक जाणीव व राष्ट्रप्रेमाचा संदेश दिला.

फक्रार्यक्रम यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंदकर यांनी सर्व मान्यवर, पालक, ग्रामस्थ व उपस्थितांचे आभार मानले. रयत समाचार

# श्रीरामपूरकरांचे दुर्लक्षित प्रश्न आमदार ओगले ‘ॲक्शन मोड’वर

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघातील विविध विषयांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत आमदार हेमंत ओगले यांनी मतदारसंघातील विविध प्रश्नांचा उलगडा करून ते जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केले.



या बैठकीत आमदार ओगले यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्यासोबत मतदारसंघातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. बैठकीत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, शहरातील गोंडवस्ती पुनर्वसन, तालुक्यातील तृतीयपंथींना घरकुल व स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देणे, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळासाठी श्रीरामपूर येथे जागा उपलब्ध करून देणे, गेल्या पंचवीस ते तीस वर्षांपासून रखडलेली श्रीरामपूर तालुका क्रीडा संकुलाची जागा, श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी जागा उपलब्ध करून देणे, न्यायिक अधिकारी श्रीरामपूर यांच्या निवासस्थानासाठी जागा, खंडकरी शेतकऱ्यांच्या जमीन अदलाबदल वाटप क्षेत्र, शिल्लक क्षेत्र व प्रलंबित मागणी क्षेत्रातील प्रश्न, जिल्हा नियोजन समिती निधी वाटपातील असमानता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या श्रीरामपूर येथील जागेवरील अतिक्रमण तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीसह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने हे प्रश्न सुटणे अत्यंत महत्त्वाचे असून यावर तात्काळ योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार ओगले यांनी केली.

यावेळी श्रीरामपूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष करण ससाणे, अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन गुजर, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे माजी सभापती बाबासाहेब दिघे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष माऊली मुरकुटे, श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांच्यासह प्रांताधिकारी किरण सावंत, पोलीस उपअधीक्षक जयवंत भवर तसेच विविध विभागांचे प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. रयत समाचार

# शोकग्रस्त श्रीरामपूरकरांची अजितदादांना श्रद्धांजली

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**



राज्याचे कर्तबगार उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे काल सकाळी अपघाती निधन झाले. त्यांच्या अपघाताची वार्ता शहरात पोहोचल्यानंतर सर्वत्र एकच खळबळ उडाली. सुरुवातीला कुणाचाही या बातमीवर विश्वास बसला नाही; मात्र दूरचित्रवाणीवर बातमी झळकल्यानंतर सर्वत्र शोककळा पसरली.

अजितदादांचे जन्मगाव देवळाली प्रवरा असल्याने त्यांचा श्रीरामपूरशी निकटचा संबंध होता. बालपणी व शालेय जीवनात चित्रपट पाहण्यासाठी मी श्रीरामपूरला येत होतो, अशा आठवणी त्यांनी सांगितल्या होत्या. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच शहरातील वातावरण सुन्न झाले. रयत समाचार

**राजकारणातील दादा माणूस हरपला : करण ससाणे**

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने लोकांसाठी झटणारा नेता म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ओळख होती. त्यांच्या अकाली जाण्याने कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. माझे वडील माजी आमदार स्व. जयंतराव ससाणे आणि अजितदादा पवार यांचे सलोख्याचे संबंध होते. श्रीरामपूर नगरपरिषदेच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

**जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारा नेता हरपला : आ. हेमंत ओगले**

देवळाली प्रवरा हे दादांचे जन्मगाव व आजोळ असल्याने त्यांचे श्रीरामपूरवर विशेष प्रेम होते. जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवणारा असा नेता पुन्हा होणे नाही. मला त्यांच्यासोबत विधिमंडळात काम करण्याची संधी मिळाली. भेटीवेळी ते नेहमी ‘श्रीरामपूर जिल्हा टोपी कुठे आहे, माझ्या आजोळचा आमदार आहेस तू; काही लागले तर सांग,’ असे म्हणायचे. चांगल्या कामाची प्रशंसा करून कायम पाठीवर हात ठेवणारे दादा आज आपल्यातून गेले. श्रीरामपूरराहुरी विधानसभा मतदारसंघाच्या वतीने मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

# चांदगाव जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात



**नेवासा । रयत समाचार**

नेवासा तालुक्यातील चांदगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चांदगाव येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजेंद्र सांगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वनाथ उंदरे होते.

फक्रार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मुटेकर यांनी केले. यानंतर विद्यार्थ्यांची कवायत व भाषणे झाली. विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. शाळेस सहकार्य करणाऱ्या व्यक्तींचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक व मार्गदर्शक नामदेव खंडागळे, सरपंच ताईबाई लेंडाळ, माजी सरपंच सुरेखा उंदरे, उपसरपंच राजू सांगळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सलीम शेख, मयुरेश्वर यात्रा कमिटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर उंदरे, तुषार उंदरे, थोरात गुरुजी, जिजाबा सांगळे, माऊली कुसळकर, दादा लेंडाळ, शंकरराव उंदरे, सर्जेराव उंदरे, पांडुरंग सोरमारे, बाबासाहेब कोतकर, नवनाथ एडके, विशाल क्षीरसागर, अंगणवाडी सेविका आशा चेमटे, साधना वखारे तसेच पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मेजर पाखरे यांचा ग्रामस्थ व शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दरवडे यांनी केले तर आभार प्रदर्शन बनकर यांनी मानले. रयत समाचार



## देवगड विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथील देवगड माध्यमिक विद्यालय येथे ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण व विविध गुणदर्शन स्पर्धातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा उगले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन, सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी अनेक ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून त्यांचे कौतुक केले. कार्यक्रमप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी, पालकवर्ग उपस्थित होते.

तसेच विद्यालयातील मुख्याध्यापिका सुनंदा उगले, शिक्षक नेहे व्ही. आर., माने एम. ए., राहाणे आर. बी., तातळे एस. एम., थोरात डी. डी., कातोरे एस. डी., वाघ एस. डी., कुदळ ए. एस., वर्पे एस. डी., शिरतार एस. एस., पवार एस. बी., भालेराव आर. ए. यांच्यासह कर्मचारीवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रयत समाचार

# नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा तहकूब



**पाथर्डी । नितीन गटाणी**

नगर परिषदेची बुधवार ता. २८ रोजी होणारी सर्वसाधारण सभा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे तहकूब करण्यात आल्याची माहिती नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दिली. नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक पार पडल्यानंतर उपनगराध्यक्ष, स्वीकृत सदस्य तसेच विविध समित्यांच्या निवडी मागील महिनाभरात संपन्न झाल्या होत्या. त्यानंतर बुधवार ता. २८ रोजी सकाळी ११ वाजता नगर परिषदेच्या नवीन इमारतीतील स्थायी समिती सभागृहात पहिली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या विषयपत्रिकेवर तब्बल ३० विषय होते.

मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची घटना घडल्यानंतर नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी सदर सभा तहकूब करून ती सोमवार ता. २ फेब्रुवारी रोजी होणार असल्याचे जाहीर केले. सभेसाठी उपस्थित सर्व सदस्यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. रयत समाचार

# शासन निर्णयाप्रमाणेच स्वीकृत नगरसेवकांची निवड करा

**अहमदनगर । रयत समाचार**

शासनाने २८ फेब्रुवारी २०१२ रोजी जारी केलेल्या शासन निर्णय व परिपत्रकानुसारच महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात यावी, अशी मागणी प्रहार अपंग क्रांती संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसंदर्भात संस्थेचे जिल्हाध्यक्ष ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, शासन निर्णयानुसार महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक म्हणून त्या त्या शहरातील क्रीडा, शिक्षण, उद्योग, पत्रकारिता, न्यायपालिका, विधी तज्ज्ञ, वैद्यकीय क्षेत्र, संस्कृती, इतिहास, साहित्य तसेच समाजसेवा या विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींची नियुक्ती करणे अपेक्षित आहे.

# बांगलादेश क्रिकेट बोर्डाचा आत्मघातकी निर्णय

बांगलादेशने दुराग्रही भूमिका घेऊन भारतात होणाऱ्या टी २० विश्वचषक स्पर्धेत न खेळण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशचा हा निर्णय म्हणजे आत्मघात आहे कारण बांगलादेश भारतात खेळला काय नि न खेळला काय भारतावर याचा काही परिणाम होणार नाही. भारतावरच नाही तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटवरही याचा काहीही परिणाम होणार नाही. बांगलादेश क्रिकेट बोर्डाने भारतात न खेळण्याचा निर्णय घेतल्यावर आयसीसीने कठोर भूमिका घेत त्यांना थेट स्पर्धेबाहेर हाकलून स्कॉटलंडला विश्वचषक खेळण्याची संधी दिली. भारतात क्रिकेट न खेळण्याची भूमिका घेऊन बांगलादेश क्रिकेट बोर्ड आयसीसीवर दबाव टाकत होता त्यांच्या या दबावाला आयसीसी बळी पडली नाही उलट आयसीसीने बांगलादेशला त्यांची जागा दाखवून दिली. भारतात न खेळण्याचा निर्णय घेऊन बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे कारण या स्पर्धेतून बाहेर पडावे लागल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्डाला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागणार आहे. या स्पर्धेतून माघार घेतल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे पाच लाख डॉलर नोंदणी शुल्क जप्त होईल याशिवाय बांगलादेश क्रिकेट बोर्डाला आयसीसीकडून मिळणारी मोठी रक्कमही मिळणार नाही. आधीच आर्थिक अडचणीत असलेला बांगलादेश क्रिकेट बोर्ड यामुळे आणखी अडचणीत येईल पण बांगलादेश क्रिकेट बोर्डाला आणि त्यांच्या देशाला भारत द्वेषाने पछाडले असल्याने त्यांना ते दिसत नाही. बांगलादेश भारत द्वेषाने किती पछाडला आहे हेच बांगलादेशने त्यांच्या या कृतीतून दाखवून दिले आहे. सुरक्षेच्या कारणाने या स्पर्धेतून माघार घेत आहोत हे बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे स्पष्टीकरण तर हास्यास्पदच आहे. भारतात खेळणाऱ्या परदेशी खेळाडूंना अतिउच्च दर्जाची सुरक्षा पुरवली जाते म्हणूनच जगातील सर्व खेळाडू भारतात खेळण्यासाठी उत्सुक असतात. भारतात खेळणाऱ्या परदेशी खेळाडूंच्या जिवाला धोका निर्माण झाला असा एकही प्रसंग अद्याप घडला नाही. बांगलादेशचेही अनेक खेळाडू भारतात अनेकदा खेळले आहेत त्यांच्या जीविताला कधी धोका निर्माण झाला ? उलट या स्पर्धेत न खेळण्याचा आपल्या बोर्डाचा निर्णय त्यांच्याच खेळाडूंना पटला नाही पण आपल्या खेळाडूंपेक्षा बांगलादेश क्रिकेट बोर्डाला पाकिस्तान महत्वाचा वाटतो. पाकिस्तानच्या नादी लागूनच बांगलादेशने हा निर्णय घेतला हे शाळकरी मुल ही सांगेल. विशेष म्हणजे ज्या पाकिस्तानसाठी बांगलादेशने हा निर्णय घेतला त्या पाकिस्तानने आयसीसीने डोळे वटारताच आपली तलवार म्यान करून या स्पर्धेत खेळण्यास होकार दिला. पाकिस्तानचा माजी कर्णधार वसीम अक्रमने तर आपल्या बोर्डाला खडसावताना बांगलादेश क्रिकेट बोर्डाचीही खिल्ली उडवली. पण भारत द्वेषाची पट्टी डोळ्यावर बांधल्याने बांगलादेशला हे दिसत नाही. वास्तविक बांगलादेश क्रिकेट बोर्डावर बीसीसीआयने जितके उपकार केले तितके कोणीही केले नसेल. बांगलादेशला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रवेश मिळावा यासाठी भारतानेच प्रयत्न केला. भारतानेच बांगलादेशची बाजू आयसीसीमध्ये मांडली आणि त्यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे दरवाजे उघडून दिले. बांगलादेश क्रिकेटकडे पैसे नव्हते तेव्हा बांगलादेश क्रिकेटला पैसे मिळवून द्यावेत या उद्देशाने जगमोहन दालमिया जे त्याकाळात आयसीसीचे प्रमुख होते त्यांनी १९९८ साली बांगलादेशमध्ये मिनी विश्वचषक नावाची नॉक आउट क्रिकेट स्पर्धा भरवली ज्यात सर्व देशांचा सहभाग होता. ही स्पर्धेत बांग्लादेशात आयोजित करण्यात आल्याने बांगलादेश क्रिकेट बोर्ड आर्थिक दृष्ट्या सक्षम झाला. जगमोहन दालमिया यांनीच इतर देशांना बांग्लादेशात खेळायला लावले आणि त्यांना आंतरराष्ट्रीय ओळख मिळवून दिली पण बांगलादेश क्रिकेट बोर्ड देखील बांगलादेश सरकार प्रमाणे कृतघ्न निघाली. असो बांगलादेशने घेतलेला हा निर्णय बुमरांग ठरणार हे सांगायला कोणत्याही ज्योतिषाची गरज नाही. भारतात न खेळण्याचा निर्णय घेऊन बांगलादेश क्रिकेट बोर्डाने स्वतःच्या हाताने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतली हे मात्र नक्की.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

## महसूल सहायकाच्या कुंचल्यातून साकारले 'कलेक्टर'
### कर्तव्य सांभाळत जोपासली कला; जिल्हाधिकाऱ्यांकडून कौतुक



**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

कर्तव्य आणि कला यांचा सुंदर संगम श्रीरामपूरच्या एका भूमिपुत्राने साधला आहे. श्रीरामपूरचे सुपुत्र व सध्या श्रीगोंदा तहसील कार्यालयात महसूल सहायक म्हणून कार्यरत असलेले शिवाजी गायकवाड यांनी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे अप्रतिम व हुबेहूब तैलचित्र साकारले आहे. या कलाकृतीने जिल्हाधिकारी भारावून गेले असून त्यांनी गायकवाड यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली.

महसूल विभागातील जबाबदाऱ्या सांभाळत असतानाच शिवाजी गायकवाड यांनी चित्रकलेची आवड जोपासली आहे. अत्यंत बारकाईने व कौशल्याने साकारलेले हे तैलचित्र जेव्हा जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात आले, तेव्हा आपल्याच रूपाची हुबेहूब प्रतिकृती पाहून ते अवाक झाले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी या कलेचे मनापासून कौतुक करताना, "शासकीय नोकरीतील जबाबदाऱ्या पार पाडत असतानाही अशा प्रकारे उच्च दर्जाची कला जोपासणे खरोखरच कौतुकास्पद आहे," अशा शब्दांत गायकवाड यांचा गौरव केला. त्यांनी चित्राचे कौतुक करत गायकवाड यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

श्रीरामपूरच्या मातीतील एका कलाकाराने आपल्या कलेच्या जोरावर जिल्ह्याच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीचे मन जिंकल्याने श्रीगोंदापारनेरचे प्रांताधिकारी श्रीकुमार चिंचकर, श्रीरामपूर प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, श्रीगोंदा तहसीलदार सचिन डोंगरे, श्रीरामपूर तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, सहायक महसूल अधिकारी अशोक नरोड, जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल सहायक अशोक मासाळ आदींनी शिवाजी गायकवाड यांचे विशेष कौतुक केले. रयत समाचार

# आपला वाढदिवस रक्तदानाने साजरा करा


# शाश्वत निराकार परमात्म्याचा बोध प्रत्येक युगाची आवश्यकता- सुदीक्षाजी महाराज
## विश्वबंधुत्वाचा भाव प्रदर्शित करीत ५९व्या निरंकारी संत समागमाची सांगता

**सांगली । रयत समाचार**

महाराष्ट्रातील तीन दिवसीय ५९वा वार्षिक निरंकारी संत समागम सांगली येथील चारशे एकरवरील विशाल मैदानावर भव्य स्वरूपात यशस्वीरीत्या संपन्न झाला. समागमाच्या समापन सत्रात सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने उपस्थित भाविक भक्तगणांना संबोधित करताना सांगितले की, शाश्वत निराकार परमात्म्याचा बोध प्राप्त करून जीवनात प्रेम, दया व करुणेचा भाव अंगीकारणे ही प्रत्येक युगाची आवश्यकता आहे.

सतगुरु माताजी पुढे म्हणाल्या की, संतजनांचे जीवन दिखावा व कट-कारस्थानांपासून मुक्त असून सहज, सरळ व सर्वांच्या कल्याणासाठी समर्पित असते. सत्संग, सेवा व सिमरणाच्या माध्यमातून आत्ममंथन करीत सजग व सकारात्मक जीवन जगण्याचे आवाहन त्यांनी निरंकारी भक्तांना केले.

पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी फुलांनी सजवलेल्या रथरूपी वाहनातून समागमस्थळी विराजमान झाले. यावेळी अनेकतेत एकतेचे दर्शन घडवीत भक्तांनी पारंपरिक वेशभूषेत नृत्य व





गीतांचे सादरीकरण केले. मिशनच्या शिकवणुकीवर आधारित संदेशप्रधान चित्ररथांचा सहभाग होता. त्यानंतर दिव्य युगुलाचे मुख्य मंचापर्यंत आगमन झाले व स्वागतगीत, नृत्याद्वारे सतगुरुंचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मुख्य सत्संगास प्रारंभ झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळी सतगुरु माताजी व निरंकारी राजपिताजींच्या पावन उपस्थितीत भव्य सेवादल रॅली पार पडली. महाराष्ट्रासह इतर राज्यांतून आलेले हजारो सेवादल बंधु-भगिनी खाकी-निळ्या वर्दीत सहभागी झाले होते. बॅण्डच्या सुरांत पी.टी. परेड, संगीतमय योगा, मानवी पिरॅमिड, मल्लखांब, एरोबिक व विविध साहसी कवायती सादर करण्यात आल्या. शेवटी सतगुरु माताजींचे सेवाप्रति मार्गदर्शनपर प्रवचन झाले.

तिसऱ्या दिवशी 'आत्ममंथन' या विषयावर बहुभाषिक कविसंमेलन पार पडले. २२ कवी व कवयित्रींनी काव्यपाठ सादर करून उपस्थित भक्तांना मंत्रमुग्ध केले. समागमस्थळी भव्य निरंकारी प्रदर्शनी उभारण्यात आली होती. पहिल्या भागात मिशनचा इतिहास, विचारधारा व देश-विदेशातील निष्काम सेवा कार्यांचे दर्शन घडविण्यात आले. दुसऱ्या भागात बाल-प्रदर्शनीद्वारे बालकांना उज्ज्वल जीवनाची प्रेरणा देणारे दृश्य सादर करण्यात आले, तर तिसऱ्या भागात संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमांची माहिती देण्यात आली. याशिवाय समागमस्थळी श्रद्धाळूंसाठी चोवीस तास सामूहिक भोजन (लंगर), कॅन्टीन, आरोग्यसेवेसाठी दवाखाने, प्राथमिक चिकित्सा केंद्र, कायरोप्रॅक्टिक चिकित्सा केंद्र, प्रकाशन साहित्य स्टॉल्स, पिण्याचे पाणी आदी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या होत्या. निरंकारी सेवादलचे महिला व पुरुष सदस्य स्मितहास्याने व निष्काम भावनेने सेवा देत होते. अशा भव्य मानवतेच्या महाकुंभातून आत्ममंथनाची प्रेरणा घेऊन भक्तगण परतले.

कौस्तुभ पुरस्काराने माताजी सन्मानित
समागमाच्या तिसऱ्या दिवशी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय कौस्तुभ पुरस्कार२०२६' सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांना सांगलीचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## युवकांनी सामाजिक बांधिलकी जपावी- शेळके
### विखे फाउंडेशनच्या हिवाळी श्रमदान शिबिरास सुरुवात




**अहमदनगर । विजय मते**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कॉलेज ऑफ फार्मसी व आय.बी.एम.आर.डी., अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५२६ या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर अकोळनेर येथे आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराचा उद्घाटन समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी सरपंच प्रतीक शेळके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उपसरपंच संदीप जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भाऊसाहेब भोर, तंटामुक्ती अध्यक्ष रमेश जाधव, ग्रामसेवक प्रविण पवार उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे प्रतीक शेळके यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांनी सामाजिक बांधिलकी जपावी, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्रिय सहभाग घ्यावा तसेच जलसंधारण व पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांमध्ये पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. युवकच देशाच्या शाश्वत विकासाचा मजबूत पाया असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवधर होते. औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. वाय. पवार तसेच आय.बी.एम. आर.डी.चे संचालक डॉ. संजय धर्माधिकारी यांनी शिबिरासाठी विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन अभियांत्रिकीचे कार्यक्रम अधिकारी प्रा. मंदार बिडवे, औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे डॉ. निलेश म्हस्के व आय.बी.एम.आर.डी.चे डॉ. एम. पी. शर्मा यांनी केले.

शिक्षक समन्वयक प्रा. डॉ. माधवी नेरकर, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. समशेर शेख, प्रा. नाना मुळीक, डॉ. अनिकेत विले, प्रा. गणेश डहाणे, प्रा. दत्ता ठाणगे, प्रा. रेणुका देवराय, प्रा. निलेश पोंधे, रविंद्र शेलार, प्रा. एम. ए. रासकर, प्रा. एस. आर. बिडवे यांनी शिबिरासाठी परिश्रम घेतले. रयत समाचार

## 3 फेब्रुवारीला 'केळी दिवस'
### प्रात्यक्षिके, शिवार फेरीचे आयोजन

**राहुरी । शफीक बागवान**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून आयोजित 'फुले कृषी महोत्सव २०२६ थेट पीक प्रात्यक्षिके व शिवार फेरी' अंतर्गत केळी संशोधन केंद्र, जळगाव येथे मंगळवार ता. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी 'केळी दिवस व शिवार फेरी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात केळी उत्पादक शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी देशभरात लागवडीखाली असलेल्या तब्बल ८० केळी वाणांची प्रायोगिक लागवड संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. फुले प्राइड, अर्धापुरी, वसई, श्रीमंती, ग्रँड नाइन, विल्यम्स, बसराई, राजापुरी आदी केळीच्या प्रगत वाणांची प्रात्यक्षिके शेतातच पाहता येणार आहेत. या कार्यक्रमात केळीच्या उत्पादन क्षमतेतील व गुणवत्तेतील फरक, लागवड पद्धती, संतुलित खत व्यवस्थापन, पाणी नियोजन, ठिबक सिंचन व फर्टिगेशन तंत्रज्ञान यावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच पानांवरील रोग, मुळकुज, सूत्रकृमी यांचे निदान व एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन पद्धतींची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. केळी बागेतील आधुनिक तंत्रज्ञानामध्ये मल्चिंग, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर, जैविक खते, सेंद्रिय उपाय, निर्यातक्षम घडाचे व्यवस्थापन तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व ड्रोन तंत्रज्ञानाच्या वापरावर विशेष भर देण्यात आला आहे. याशिवाय केळीपासून तयार होणारी मूल्यवर्धित उत्पादने केळी चिप्स, पावडर, पीठ, वेफर्स, केळी वाईन, जॅम आदींच्या निर्मिती तंत्रज्ञानाची माहिती देण्यात येणार असून घरगुती व लघुउद्योग स्तरावरील प्रक्रिया, बाजारपेठेच्या संधी व उत्पन्न वाढीचे मार्ग शेतकऱ्यांसमोर मांडले जाणार आहेत. या कार्यक्रमात शिवार फेरी, शेतकरीशास्त्रज्ञ संवाद, शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन, अनुभवांची देवाणघेवाण तसेच केळी लागवड व काढणीसाठी उपयुक्त यांत्रिकीकरण व अवजारांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात येणार आहे. केळी उत्पादक शेतकऱ्यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के आणि जळगाव केळी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. अरुण भोसले यांनी केले आहे. रयत समाचार

# मौलाना आझाद चौकात प्रजासत्ताक दिन साजरा



**श्रीरामपूर । रयत समाचार**

येथील समस्त मुस्लिम समाजातर्फे सालाबादप्रमाणे मौलाना आझाद चौकात प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. शहरातील सुप्रसिद्ध आर्किटेक्ट जहीर सलीम पीरजादे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात सिव्हिल हॉस्पिटल, अहिल्यानगर येथील मेडिकल ऑफिसर तसेच महात्मा फुले आरोग्य योजनेचे रिजनल मॅनेजर डॉ. वसीम मुनीर शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या कार्यक्रमात आमदार हेमंत ओगले व नगराध्यक्ष करण ससाणे यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरवासीयांना शुभेच्छा दिल्या. खासदार गोविंदराव आदिक उर्दू हायस्कूल मौलाना आझाद शाळा क्रमांक चार व परमवीर शहीद अब्दुल हमीद शाळा क्रमांक पाच येथील विद्यार्थी व शिक्षकांसह नगरपालिकेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते मुझफ्फर शेख, माऊली मुरकुटे, नगरसेवक दिलीप नागरे, रईस जहागीरदार, डॉ. दिलीप शिरसाट, कलीम कुरेशी, जावेद शेख, शाहिद कुरेशी, संतोष परदेशी, नगरसेविका नागेश्वरी एडके, आशा परदेशी, लकी सेठी, बिट्टू कक्कड, अशोक उपाध्ये, माजी नगरसेविका मंगलाताई तोरणे, मुक्तार शाह, रितेश एडके, जलीलभाई काझी, मुन्ना पठाण, अकिल सुन्नाभाई, रियाज पठाण, अकबर पठाण, गफार पोपटिया, आयाज तांबोळी, सत्यनाथ शेळके, लतीफ शेख, युनूस जमादार, अहमद शहा, शरीफ मेमन, मोहसिन पठाण, इमदाद पठाण, शाहरुख कुरेशी, फारूक शाह, रियाज बागवान, वसीम पीरजादे आदींसह मोठ्या संख्येने नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

ध्वजारोहण समितीचे अध्यक्ष अहमद जहागीरदार, फिरोज दस्तगीर, अबू पेंटर आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पत्रकार सलीमखान पठाण यांनी मानले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मिठाई वाटप करण्यात आले.